॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

Phone : (02462) 229246

## OFFICE OF THE REGISTRAR

Website: www.srtmun.ac.i

Fax : (02462) 229572

E-mail: srtmunregistrar@gmail.com

प्रस्तुत विद्यापीठ परिसर, उपपरिसर, लातूर, परभणी, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली आणि कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट येथील शिक्षकांसाठी

जावक क्रमांक आस्था/०२/२०१९–२०/६३०

दिनांक २३–०३–२०२०

— परिपत्रक —

**संदर्भ** : (१) डी.ओ. क्र. Secy(HE)/MHRD/2020 New Delhi dated 21 March, 2020
(२) यु.जी.सी पत्र क्रमांक F-No-1-14/2020(Website) dated 21 March, 2020
(३) महाराष्ट्र शासन शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक उशिस/कोरोना/मवि–१/२०२०/३८१९/४०४२ दिनांक २३ मार्च, २०२०

उपरोक्त संदर्भानुसार, या परिपत्रकान्वये विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक संकुले, उपपरिसरातील सर्व शैक्षणिक संकुले, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट येथील शिक्षकांना कळविण्यात येते की, सचिव, मानव संसाधन विकास मंत्रालय, उच्चतर शिक्षा विभाग, उच्च शिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली तसेच विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली आणि शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक ०७, ०८ व ०९ अन्वये प्राप्त निर्देशानुसार 'कोरोना' (कोव्हीड–१९) चे विषाणूचे देशभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी दिनांक २३ मार्च, २०२० ते ३१ मार्च, २०२० दरम्यान सर्व शैक्षणिक संकुलातील कामकाज बंद राहील.

दिनांक २३ मार्च, २०२० ते ३१ मार्च, २०२० या कालावधीत संलग्न महाविद्यालयातील शिक्षक/संशोधकयांनी आपले घरी राहून (Work From Home) संबंधित विभागाचे कामकाज करावे. तद्वतच पुढील सत्र/शैक्षणिक वर्षाकरिता शैक्षणिक साहित्य तयार करणे, संशोधन लेख, संशोधन पेपर व संशोधना संदर्भात इतर आवश्यक कार्यवाही करावी, विद्यार्थ्यांना संशोधनासाठी उपयुक्त होईल असे प्रश्नसंच (Question Bank) तयार करावे. त्याचप्रमाणे 'एक भारत श्रेष्ठ भारत' अंतर्गत आवश्यक ते प्रकल्प तयार करावेत. याबाबीसंदर्भात तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक २१ मार्च, २०२० मधील सर्व सूचनांनुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

सर्व शिक्षकांना सूचित करण्यात येते की, आपण तयार केलेले स्टडी मटेरियल सर्व विद्यार्थ्यांना ई–मेल, व्हॉटस् अॅप/इतर माध्यमांव्दारे उपलब्ध करून द्यावेत, जेणेकरून विद्यार्थी घरी बसून अभ्यास करतील. सर्व शिक्षकांनी घरी राहून केलेल्या कामांचा (Work From Home) अहवाल संचालकांना लिखीत स्वरूपात द्यावा. संचालकांनी सदर अहवाल एकत्रित करून त्याची माहिती कुलसचिव कार्यालयात सादर करावी.

**वरील बाबींशिवाय सर्व संचालक आणि सर्व शिक्षक यांना कळविण्यात येते की, नॅक च्या अनुषंगाने आवश्यक ती कामे दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत आपले घरी राहून (Work From Home) पूर्ण करावीत.**

जे विद्यार्थी अद्यापही वसतिगृहात रहात आहेत, त्यांना आणि विशेषत: वसतिगृहात राहणाऱ्या परदेशातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी वसतिगृहातच रहावे आणि सुरक्षिततेसंदर्भातील आवश्यक काळजी घ्यावी.

उपरोक्त कालावधी हा शिक्षक/संशोधक यांचा कर्तव्य कालावधी (On Duty) म्हणून ग्राहय धरण्यात येईल.

कुलसचिव

प्रति,
(१) सर्व संचालक/विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक संकुले/प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
(२) संचालक, उपपरिसर, लातूर व परभणी, प्रस्तुत विद्यापीठ
(३) प्रभारी प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ
(४) समन्वयक, कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ.
(५) सर्व प्राचार्य, संलग्न महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
(६) श्री. अजय दर्शनकार, सिस्टिम एक्स्पर्ट, प्रस्तुत विद्यापीठ (प्रत संकेतस्थळावर ठेवण्यासाठी)
(७) जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ

प्रत माहितीस्तव —
१ मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२ मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.